**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि.**

**दिनांक : 16.06.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गत मंगळवारी २० हजार कोटी रुपयांचं वितरण.**
2. **आगामी विधानसभा निवडणूक एकत्रितपणे लढविण्याचा महाविकास आघाडीचा निर्णय.**
3. **नवीन सहकार धोरणाद्वारे तळागाळातील लोकांच्या समृद्धीचा प्रयत्न करण्याची सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची पुण्यात ग्वाही.**
4. **अठराव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उत्साहात उद्घाटन.**

**आणि**

5. **भारत सासणे, देविदास सौदागर यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर.**

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या मंगळवारी, १८ जूनला वाराणसी इथं आयोजित एका कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गंत नऊ कोटी तीन लाख शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २० हजार कोटी रुपये जमा करणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्ली इथं बातमीदारांना दिली. या योजनेच्या सतराव्या हप्त्याच्या रक्कमेचं हे वाटप आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविण्यात आली आहेत.

**मविआ**

आगामी विधानसभा निवडणूक महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष एकत्रितपणे आणि अधिक ताकदीनं लढवतील असा विश्वास कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी काल मुंबईत व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीतील यशाबद्दल राज्यातील जनतेचे आभार मांनण्यासाठी आघाडीतील तिन्ही पक्षांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचीही भाषणं झाली.

**मोहोळ**

केंद्रातील भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या नवीन सहकार धोरणाची घोषणा लवकरच केली जाणार असून, या धोरणाच्या माध्यमातून तळागाळातील लोकांचं जीवनमान समृध्द करण्यावर भर दिला जाईल, अशी माहिती केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघानं आयोजित केलेल्या वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. पुण्याजवळील पुरंदर विमानतळ, लोहगाव विमानतळावरील धावपट्टीचां विस्तार आणि नवी मुंबई विमानतळाकडे प्राधान्यानं लक्ष देणार आहे. पुरंदर विमानतळाला संरक्षण मंत्रालयाची मान्यता मिळाली असून या कामाला गती देण्याचा आपला प्रयत्न राहील, असं मोहोळ म्हणाले.

**परतावा यूजीसी**

उच्चशिक्षण संस्थांमधला प्रवेश विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा अन्यत्र प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्काचा परतावा देणं संबंधित संस्थेला बंधनकारक राहणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानं २०२४-२५ या वर्षासाठी जाहीर केलेल्या शुल्क परतावा धोरणात ही तरतूद करण्यात आली आहे. प्रवेश रद्द केल्यास पूर्ण शुल्क परत मिळत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात केल्याच्या पार्श्वभूमीवर यूजीसीनं हा निर्णय घेतला आहे. केंद्र किंवा राज्य सरकारांच्या अखत्यारीतल्या उच्च शिक्षणसंस्था, आयोगाने मान्यता दिलेल्या संस्था, अभिमत विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू राहील.

**मुंडे**

राज्यात बी बियाणं, खतं मुबलक प्रमाणात उपलब्ध असून खतांची अतिरिक्त मागणी येत्या आठवडाभरात पूर्ण होईल, असं राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल सांगितलं. मुंडे यांनी काल दूरस्थ पद्धतीनं घेतलेल्या बैठकीत बियाणांची चढ्या भावानं विक्री, बोगस बियाण्यांची विक्री, लिंकिंग यासारख्या गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसंच जून अखेरपर्यंत 75 टक्के पीक कर्जाचं वितरण करण्याच्या सूचनाही दिल्या. बी-बियाणे, खतं पुरवठा सुरळीत होण्यासाठी कृषी विभाग आणि जिल्हा कार्यालयानं प्रत्येक तालुक्यात किमान तीन भरारी पथकं नेमावीत आणि त्यांनी दररोज किमान 25 दुकानांना अचानक भेटी द्याव्यात. अशा सूचना मुंडे यांनी दिल्या.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**V/C/ मिफपुरस्कार**

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन काल माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि इतरांच्या उपस्थितीत झालं. यावेळी व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना प्रदान करण्यात आला. याबद्दलची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.

*१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सुरुवात झाली ती नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या प्रांगणात, बिली अँड मॉली- ॲन ऑटर लव्ह स्टोरी या उद्घाटनाच्या माहितीपटाने. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यावेळी उपस्थित होते. चित्रपटांमुळे मनोरंजन तर होतंच, शिवाय आर्थिक वाढीला चालना मिळते आणि रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात, असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं. भारतीय चित्रपटक्षेत्राच्या वाढीसाठी सरकार वचनबद्ध आहे. माहितीपट, लघुपट, ॲनिमेशनपट निर्मात्यांनी भारतात येऊन चित्रीकरण करावं, असं आवाहन त्यांनी केलं. महोत्सवाच्या औपचारिक उद्घाटन सोहळ्याला अभिनेता रणदीप हुडा, अभिनेत्री दिव्या दत्ता, ज्येष्ठ निर्माते किरण शांताराम यांच्यासह देशविदेशातले अनेक मान्यवर उपस्थित होते. पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेला आणि प्रतिष्ठेच्या कान चित्रपट महोत्सवात यंदा ला सिनेफ पुरस्कार पटकवणारा 'Sunflowers Were The First Ones To Know' हा लघुपटही दाखवण्यात आला. २१ जूनपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात एकंदर ३१४ चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. तसंच चित्रपटांशी संबंधित विविध विषयांवरची चर्चासत्रं, मार्गदर्शनपर व्याख्यानं आणि पहिल्यांदाच माहितीपट फिल्म बझारचं आयोजन या महोत्सवात करण्यात आलं आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.*

**अकादमी पुरस्कार**

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार आणि युवा पुरस्कार काल जाहीर झाले. भारत सासणे यांच्या ‘समशेर’ आणि ‘भूतबंगला’ या कादंबरीला मराठीतील हा पुरस्कार जाहीर झाला आहे. युवा पुरस्कारासाठी तुळजापूर इथले साहित्यिक देविदास सौदागर लिखित ‘उसवण’ या कादंबरीची निवड झाली आहे. ५० हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं दोन्ही पुरस्काराचं स्वरूप आहे. कुमार आणि किशोर मुलांसाठी विशेष पात्र निर्माण करावं अशी इच्छा होती, बुद्धीचातुर्य कथा सांगण्याचा प्रयत्न रुजला याचा आनंद वाटतो अशी प्रतिक्रिया भारत सासणे यांनी दिली. काळानुरूप तयार कपड्यांची मागणी वाढल्यानं पारंपरिक शिवणकाम बंद होऊ लागलं आहे. अशाच एका शिंप्याच्या उपासमारीची कहाणी ‘उसवण’ या कादंबरीत मांडली आहे. यातील बरेचसे अनुभव व्यक्तीगत आहेत. आजवरच्या जगण्याची आणि कष्टाची नोंद या पुरस्कारानं झाली अशी प्रतिक्रिया देविदास सौदागर यांनी दिली.

**राणे**

रत्नागिरी जिल्ह्यातली पाच काम प्राधान्यानं पूर्ण करणार असल्याचं खासदार नारायण राणे यांनी म्हटलं आहे. खासदार झाल्यांनतर प्रथमच सिंधुदुर्गच्या दौऱ्यावर आलेल्या राणे यांनी काल कुडाळ इथं पत्रकार परिषद घेतली. रत्नागिरीचा पाणी प्रश्न, विमानतळ, रोजगार, पूर परिस्थिती आणि पर्यटन हे प्रश्न प्राधान्याने सोडवणार असल्याचं ते म्हणाले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात विविध उद्योगधंदे आणण्यासाठी प्रयत्न सुरु असून इथं पर्यटन उद्योगाला चालना मिळावी यासाठी निश्चित प्रयत्न करणार असल्याचं राणे यांनी सांगितलं.

**शाळा प्रवेश**

मे महिन्याच्या सुट्या संपवून राज्याच्या विविध भागातील शाळा कालपासून सुरू झाल्या. पहिल्या दिवसानिमित्त पुण्यातील न्यू इंग्लिश मीडियम शाळेत काल एक अभिनव उपक्रमात दुर्गुण दूर सारून चांगल्या सवयी अंगीकारण्याचं दान विद्यार्थ्यांनी वासुदेवाला दिलं. मोबाईलचा अतिवापर करणार नाही, निकृष्ट अन्न खाणार नाही, प्लास्टिक साहित्याचा वापर टाळू, नियमित व्यायाम करू, मैदानी खेळ खेळू, शुभंकरोती म्हणू अशी प्रतिज्ञा करीत पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी वासुदेवाच्या झोळीत दान टाकलं. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं वाकड इथली कन्या शाळा आणि थेरगाव इथली प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे- पाटील यांनी मार्गदर्शन केलं. येत्या १५ जुलैपर्यंत पालिकेच्या शाळांमध्ये पुस्तकवाटप करण्यात येणार आहे.

**खाडे**

खासगी शाळांप्रमाणेच सरकारी शाळांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यास शासनानं प्राधान्य दिलं आहे. आदर्श भावी पिढी घडविण्यासाठी शिक्षकांबरोबरच पालकांनी पुढे येणं गरजेचं आहे, असं मत सांगलीचे पालकमंत्री सुरेश खाडे यांनी काल शाळाप्रवेश कार्यक्रमात व्यक्त केलं. विद्यार्थ्यांचं गुलाबपुष्प देऊन, औक्षण, खाऊवाटप करून स्वागत करण्यात आल्याचं आमच्या लातूर, हिंगोली, रत्नागिरीसह ठिकठिकाणच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे.

**गजाननमहाराज पालखी**

पंढरपूरच्या दिशेनं  मार्गस्थ झालेला संतश्रेष्ठ गजाननमहाराज पालखी सोहळा दोन दिवसाच्या प्रवासानंतर काल अकोल्यात दाखल झाला. पालखीच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी पताका आणि आकर्षक देखावे उभारण्यात  आले आहेत. यंदा पालखीचं ५५ वं  वर्ष आहे. भौरद इथं दोन दिवस पालखी मुक्कामी असते.

**मृत्यू**

कोयना एक्स्प्रेसखाली सापडून तीन महिलांचा शुक्रवारी रात्री उशिरा कोल्हापुरात मृत्यू झाला. पोलिस तपासात या तिघी इचलकरंजी इथल्या मायलेकी असल्याचं निष्पन्न झालं असून ही आत्महत्या असल्याची शक्यता शाहूपुरी पोलिसांनी वर्तवली आहे. कोयना एक्स्प्रेस स्थानकाकडं येत असताना या तिघींना जोराची धडक बसली असं पोलिसांनी सांगितलं.

**हवामान**

कोकणात बऱ्याच ठिकाणी वीजांसह पावसाची शक्यता असून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.